# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४० ००१

**ई-मेलद्वारे**

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/दोन/प्र.क्र.४(२४-२५)/१०६०
नागपूर ४४०००१, दिनांक - ०५/१२/२०२४

प्रति,
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रा.), नाशिक
मुख्य वनसंरक्षक (प्रा.), सर्व
वनसंरक्षक (प्रा.), सर्व

**विषय :** वन व्यवस्थापनामध्ये वनमजुर या संवर्गाची आवश्यकता व सहभाग

**संदर्भ :** या कार्यालयाचे पत्र क्र. कक्ष-१०(२)/आस्था/दोन/प्र.क्र.४(२४-२५)/१९, दिनांक २२/५/२०२४

प्रस्तुत प्रकरणी क्षेत्रीय स्तरावरुन प्राप्त आकडेवारीचे आधारे वनविभागात १२९९१ वनसेवकांची पदे निर्माण करणेबाबत प्रस्ताव संदर्भिय पत्रान्वये शासनास सादर करण्यात आला होता. (प्रत संलग्न). सदर प्रस्तावाचे परिशिष्ट-३ मध्ये वनविभागनिहाय पदांचा तपशील नमुद केला आहे.

२. सदर पदनिर्मितीच्या प्रस्तावाचे अनुषंगाने बाह्य यंत्रणेद्वारे शक्य असणा-या कामाकरीता आवश्यक मनुष्यबळ व नियमित आवश्यक मनुष्यबळ अशा दोन भागात विभागणी प्रस्तावित करावयाची असून सदर मुद्दे खालीलप्रमाणे आहे.

(अ) **वन परिक्षेत्र कार्यालयात बाह्य यंत्रणेद्वारे शक्य असणा-या कामाचे स्वरुप व त्याकरीता आवश्यक मनुष्यबळ** :-

i) वन परिक्षेत्र कार्यालयात बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाच्या मनुष्यबळाचे काम हे Multitasking स्वरुपाचे असेल. त्यामध्ये शिपाई, मदतनीस, सफाईकामगार, प्रिंटर ऑपरेटर, रखवालदार, रक्षक इ. स्वरुपाच्या कामाचा समावेश असेल. त्यामुळे वन परिक्षेत्र कार्यालयात सद्या मंजूरव कार्यरत असलेल्या पदांव्यतिरिक्त कार्यालयनिहाय अशा बाह्य यंत्रणेद्वारे भरावयाच्या कमीत कमी किती मनुष्यबळाची आवश्यक आहे.

ii) वन विभागांतर्गत विश्रामगृहे, शासकीय निवासस्थापने इ. मध्ये बाह्ययंत्रणेद्वारे भरावयवाच्या मनुष्यबळाचे काम हे Multitasking स्वरुपाचे असेल. त्यामध्ये खानसामा, शिपाई, मदतनीस, सफाईकामगार, रखवालदार, माळी इ. स्वरुपाच्या कामांचा समावेश असेल. सबब, राज्यात वनविभागाची किती विश्रामगृहे व शासकीय निवासस्थाने आहे.

त्यानुषंगाने विश्रामगृहे, शासकीय निवासस्थाने इ. मध्ये सध्या मंजूर व कार्यरत असलेल्या पदांव्यतिरिक्त अशा बाह्ययंत्रणेद्वारे भरावयाच्या कमीत कमी किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे.

(ब) **वनविभागांतर्गत क्षेत्रीय कामांसाठी (Field Work) नियमित आवश्यक मनुष्यबळ :- खालील कामांसाठी क्षेत्रनिहाय (range wise) किती मनुष्यबळाची आवश्यकता आहे.**

i) वायरलेस यंत्रणेसाठी लागणारे मनुष्यबळ

ii) आपत्कालीन यंत्रणा (Rescue Team) साठी लागणारे मनुष्यबळ

iii) गस्त, संरक्षण, Anti-Smuggling, Anti-Poaching, सेवा (वनीकरण, वृक्षारोपन, वणवे विझवणे, लाकूडतोड, लाकूडफाटा जमवणे इ.) इ. वन्य कामांसाठी लागणारे मनुष्यबळ

३. वरील मुद्दांचे अनुषंगाने शासनास माहिती सादर करणेकरीता खालीलप्रमाणे प्रपत्रात माहिती सादर करावी.

**मुद्दा क्र. (अ)(i)**

| अ.क्र. | वनवृत्त | वनविभाग (निर्देशन विभाग / प्रादेशिक / वन्यजीव / सामाजिक / कार्य आयोजन / इ. सर्व शाखा) | कार्यालयांची (परिक्षेत्र स्तरापर्यंत) एकूण संख्या | शिपाई, मदतनीस, सफाईकामगार, प्रिंटर ऑपरेटर, रखवालदार, रक्षक इ. स्वरुपाच्या कामाकरीता बाह्य यंत्रणेद्वारे आवश्यक मनुष्यबळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

**मुद्दा क्र. (अ)(ii)**

| अ.क्र. | वनवृत्त | वनविभाग (निर्देशन विभाग / प्रादेशिक / वन्यजीव / सामाजिक / कार्य आयोजन / इ. सर्व शाखा) | विश्राम गृह, शासकीय निवासस्थान, निरिक्षण कुटी इ. ची एकूण संख्या | खानसामा, शिपाई, मदतनीस, सफाईकामगार, रखवालदार, माळी इ. स्वरुपाच्या कामाकरीता बाह्य यंत्रणेद्वारे आवश्यक मनुष्यबळ | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | | | | |

**मुद्दा क्र. (ब)**

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग (प्रादेशिक / वन्यजीव / सामाजिक) | वन परिक्षेत्रांची एकूण संख्या | **एकूण आवश्यक नियमित मनुष्यबळ** | | | | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | वायरलेस यंत्रणेसाठी लागणारे मनुष्यबळाची संख्या | आपत्कालीन यंत्रणा (Rescue Team) साठी लागणारे मनुष्यबळाची संख्या | गस्त, संरक्षण, Anti-Smuggling, Anti-Poaching, सेवा (वनीकरण, वृक्षारोपन, वणवे विझवणे, लाकूडतोड, लाकूडफाटा जमवणे इ.) इ. वन्य कामांसाठी लागणारे मनुष्यबळाची संख्या | एकूण | |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) |
| | | | | | | | | |

तरी वरील प्रपत्रात माहिती तात्काळ सादर करावी.

४. वरील माहिती सादर करण्यासोबतच उपरोक्त कामांसाठी लागणा-या मनुष्यबळाच्या गरजेचे विश्लेषण करुन नेमके मुद्देनिहाय समर्थन (To the point justification) सादर करावे.

वरीलप्रमाणे माहिती ही दिनांक ९/१२/२०२४ पर्यत या कार्यालयास सादर करावी.

**सहपत्र** : संदर्भिय पत्राची प्रत

(एम. श्रीनिवास राव)
अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक
(प्रशासन-दुय्यम संवर्ग)

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :- प्रधान सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२

# प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय

वनभवन, रामगिरी रोड, पोलिस जिमखाना शेजारी, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४० ००१

**ई-मेलद्वारे**

क्र. कक्ष-१०(२)/आस्था/दोन/प्र.क्र.४(२४-२५)/95
नागपूर ४४०००१, दिनांक - २२/०५/२०२४

प्रति,
प्रधान सचिव (वने)
महसुल व वनविभाग
मंत्रालय मुंबई-३२

**विषय :** वन व्यवस्थापनामध्ये वनमजुर या संवर्गाची आवश्यकता व सहभाग

महाराष्ट्र वन विभाग सध्या वैधानिक वनक्षेत्रासह, वनेत्तर क्षेत्रातील वने आणि वन्यजीव याचे व्यवस्थापन करीत आहे. राज्याचे ६१९०७ चौ.कि.मी. वनक्षेत्र हे राज्यातील विविध गावात व त्याच्या लगतच्या क्षेत्रात विखुरलेले आहे. सदर वनक्षेत्राच्या प्रशासकीय व्यवस्थापनासाठी ११ प्रादेशिक वृत्ते आहेत. तसेच राज्यात ४७ प्रादेशिक वनविभाग व १५ वन्यजीव विभाग असे एकूण ६२ वनविभाग आहेत. त्या अंतर्गत ३७५ प्रादेशिक परिक्षेत्रे व ९९ वन्यजीव परिक्षेत्र व २८८ सामाजिक वनीकरण परिक्षेत्र असे एकूण ७६२ परिक्षेत्र कार्यालये आहे. परिक्षेत्रांतर्गत १४८० प्रादेशिक व ३०४ वन्यजीव असे एकूण १७८४ परिमंडळ व त्याअंतर्गत ५५५९ प्रादेशिक व १०९२ वन्यजीव असे एकूण ६६५१ नियतक्षेत्र आहेत. नियतक्षेत्रात येणा-या वनक्षेत्राच्या संरक्षण व संवर्धनाची जबाबदारी ही वनरक्षकाकडे आहे. एका वनरक्षकाकडे सर्वसाधारणपणे ९ चौ.कि.मी. वनक्षेत्र + ४७ चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्र येते. वरील शाखाव्यतिरिक्त वनविभागात कार्य आयोजना, संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण या शाखा आहेत.

२. वनविभागात वनसंवर्धन, संरक्षण व विकासाची कामे निरनिराळ्या योजनाअंतर्गत राबविली जातात. सदर कामे ही श्रमाभिमुख असून दर वर्षी ग्रामीण व दुर्गम भागात अकुशल मजूरांमार्फत मंजूर असलेली विविध कामे ठराविक कालावधीसाठी राबविण्यात येतात. मजूरांना विविध योजनेंतर्गत मजूरीपोटी मंजूर मजुरीदराप्रमाणे उपलब्ध अनुदानातून देण्यात येते.

३. कायम (अधिसंख्य) मजुरांची पध्दत सन १९९६ पूर्वी अस्तित्वात नव्हती. तथापी वनविभाग वर्षानुवर्ष कामावरील रोजंदारी मजूरांचा प्रदीर्घ कालावधी विचारात घेऊन वनविभागामध्ये योजनांतर्गत / योजनेत्तर कामामध्ये सलग कार्यरत असलेल्या ज्या रोजंदारी मजूरांनी दि. १/११/१९९४ रोजी ५ वर्षाची सलग सेवा पूर्ण केलेली आहे अशा ८०३८ मजूरांना दिनांक १/११/१९९४ पासून अधिसंख्य पदावर कायम करणेबाबत शासनाने दिनांक ३१/१/१९९६ चे शासन निर्णयान्वये निर्णय घेतला. पाच वर्षाच्या सलग सेवेचा कालावधीची गणना करताना वनविभागातील योजनांतर्गत / योजनेत्तर कामामध्ये रोजंदारी मजूरांनी प्रत्येक वर्षात कमीत कमी २४० दिवस काम केले असावे, अशी त्यामध्ये अट होती. याकरीता

रोजगार हमी योजना किंवा रोजगार हमी देणा-या तत्सम योजनेवर केलेल्या कामाचे दिवस विचारात घेण्यात येऊ नये, असेही सदर शासन निर्णयात नमुद आहे. तद्नंतर सामाजिक वनीकरण विभाग व वनविभाग यांचेकडून दिनांक १९/१०/१९९६, १६/३/१९९८, २९/१/२०००, २२/१/२००४ अन्वये पुरक शासन निर्णय निर्गमित करुन अनुक्रमे ११६४, १६१९, ६०७ व १४ मजूरांना दिनांक १/११/१९९४ पासून नियमित करण्यात आले.

४. त्यानंतर दिनांक १/११/१९९४ ते ३०/६/२००४ दरम्यान सलग किंवा तुटक-तुटकरित्या प्रतिवर्ष किमान २४० दिवस योजना / योजनेत्तर योजनेवर काम केलेल्या वनविभागातील ५०८९ व सामाजिक वनीकरण विभागातील ४५१ अशा एकूण ५५४० मजूरांना दिनांक १/६/२०१२ पासून अधिसंख्य पदावर कायम करणेबाबत शासनाने दिनांक १६/१०/२०१२ चे शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेऊन त्या प्रमाणात अधिसंख्य पदे निर्माण करणेबाबत निर्णय घेतला होता. त्यामध्ये खालील अटी व शर्ती होत्या.

(१) त्यांना पूर्वीचे वेतन व तद्नुषंगीक लाभ देय होणार नाही.

(२) त्यांना दि. १/६/२०१२ रोजी प्रचलित सेवानिवृत्ती वेतन व महाराष्ट्र नागरी सेवेच्या तरतूदी लागू राहतील.

(३) उपरोक्त ५०८९ रोजंदारी कामगारांना वरिष्ठता व पात्रतेचे निकष लावून कायम करण्यात यावे.

(४) पाच वर्षाच्या सेवेचा कालावधीची गणना करताना वनविभागातील योजनांतर्गत / योजनेत्तर योजनेवर रोजंदारी मजूरांनी प्रत्येक वर्षात कमीत कमी २४० दिवस काम केले असावे. याकरीता रोजगार हमी योजना किंवा रोजगार हमी देणा-या तत्सम योजनेवर केलेल्या कामाचे दिवस विचारात घेण्यात येऊ नये.

(५) दिनांक ३१/१/१९९६ च्या निर्णयाप्रमाणे त्यावेळी पात्र असलेले तथापी काही कारणामुळे नियमित न झालेले रोजंदारी मजूरांची सेवा नियमित करण्यात याव्यात. वनमजूरांना गट-ड मध्ये नेमणूक करण्याकरीता वयोमर्यादेसंबंधी अट शिथील करण्यात यावी, तथापी दिनांक १/६/२०१२ रोजी त्याचं वय सेवानिवृत्तीसाठी विहित वयोमर्यादेपक्षा जास्त नसावे.

(६) काही वनमजूरांनी त्यांच्या रोजंदारी कामगारासंबंधी नियमित करण्याबाबत प्रकरण विविध स्तरावर न्यायप्रविष्ठ केली असल्यास, अशा प्रकरणात न्यायप्रविष्ठ असताना सेवा नियमित करणे शक्य होणार नसल्यामुळे अशा प्रकरणात संबंधितांनी न्यायप्रविष्ठ सर्व प्रकरणी परत घेतल्यानंतरच त्यांच्या सेवा नियमित करण्यात याव्यात.

५. तद्नंतर शासन निर्णय दिनांक १६/१०/२०१२ अन्वये नियमत करावयाचे राहून गेलेल्या ५६९ मजूरांना शासन निर्णय दिनांक १०/५/२०१८ अन्वये दिनांक १/६/२०१२ पासून अधिसंख्य पदावर कायम करण्यात आले.

६.	रोजगार हमी योजनेंतर्गत काम केलेल्या मजूरांना कायम करणेबाबत शासनाने कोणताही धोरणात्मक निर्णय घेतलेला नाही. त्यामुळे रोजगार हमी योजनेंतर्गत काम केलेल्या मजूरांना शासन सेवेत कायम करण्यात आलेले नाही.

७.	शासनाने दिनांक ३१/१/१९९६ व दिनांक १६/१०/२०१२ चे शासन निर्णयान्वये धोरणात्मक निर्णय घेऊन अटी व शर्ती पुर्ण करणा-या **१७५५१** रोजंदारी मजूरांना अधिसंख्य पदावर सामावून घेतले. परंतू वनमजूरांची नियमित पदे निर्माण केली नाहीत. अधिसंख्य पदावर कार्यरत वनमजूर हा सेवानिवृत्त / पदोन्नत / मृत्यू झाल्यास सदर पद व्यपगत होते. अशा प्रकारे पदे व्यपगत होता-होता सद्यास्थितीत (दिनांक १/४/२०१४) ४५४५ अधिसंख्य मजूर कार्यरत आहेत. तसेच सदर मजूरांची पदे सुध्दा येणा-या काळात व्यपगत होऊन सदर संवर्गच संपुष्टात येणार आहे.

८.	येथे असे निदर्शनास आणून देण्यात येते की, पूर्वीपासूनच वनविभागाच्या क्षेत्रीय कामकाजात मजूरांची महत्वाची भूमिका राहीली आहे. वनमजूर सर्वसाधारणपणे नियतक्षेत्र मदतनीस / क्षेत्र सहाय्यक मदतनीस, वन परिक्षेत्र कार्यालयात कामकाजाकरीता मदतनीस, रोपवाटीका मजूर, वन उद्यान मजूर, चौकीदार, तपासणी नाका मदतनीस, आगार मदतनीस, वनविश्रामगृहावर मदतनीस, टपालवाहक, संरक्षण पथक मदतनीस, बिनतारी संदेश केंद्र मदतनीस, कॅम्प ऑफिस मदतीस, निरिक्षण कुटीवर मदतनीस, अशी वेगवेगळी कामे करतात. परंतू वनविभागात दिवसेंदिवस अधिसंख्य मजूर कमी होत असून पुढील काळात सदर संवर्ग संपुष्टात येणार आहे. परंतू त्यांची गरज वनविभागास कायम भासणार आहे.

९.	वनविभागात एका वनरक्षक / वनपालाचे कार्यक्षेत्र मोठे असल्याने एकट्या वनरक्षकास एवढ्या मोठ्या क्षेत्राचे संरक्षण शक्य होत नाही. एका वनरक्षकाचे मानाने त्याच्याकडे असलेले क्षेत्र जास्त असून एवढ्या क्षेत्राचे संरक्षणाची जबाबदारी त्याचेवर असल्याने ते अत्यंत दबावाखाली आहेत. तसेच वनक्षेत्रात एकट्या वनरक्षकास गस्त करणे जोखमीची बाब आहे. वनविभागात दिवसेंदिवस महिला वनरक्षक / वनपालांची संख्या वाढत आहे. त्यांनाही एकट्याने गस्त करणे अवघड काम आहे.

१०.	अलीकडच्या काळात मानव-वन्यजीव संघर्षाचे घटनांमध्ये पूर्वीपेक्षा मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. अशा घटनांना आळा घालणे तसेच वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांमध्ये झालेली नुकसान भरपाई संबंधितांना वेळेत अदा करणे करीता घटनास्थळाचा पंचनामा करणे व इतर अनुषंगिक दस्ताऐवज तपासणी करुन परिपूर्ण प्रकरण तयार करणे यामध्ये वनरक्षक व वनपाल यांचा बहुतांशी वेळ खर्ची जातो. त्यामुळे त्यांना त्यांची नियमित गस्त करणे तसेच संवेदनशील भागामध्ये अधिकची गस्त करणे या करीता संबंधित वनरक्षक यांना त्यांचे कर्तव्यवेळामध्ये संपूर्ण कामे करणे शक्य होत नाही. याकरीता वनमजूराची वनरक्षकासोबत सहाय्यक म्हणून आवश्यकता आहे.

११.	महाराष्ट्र राज्याचे बहुतांश वनक्षेत्र हे इतर राज्यांचे सिमेला लागून आहे. अशा सिमालगत वनक्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात वन्यजीवांची तस्करी व अवैध वनोपज वाहतुकीच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे असे वनक्षेत्र हे संवेदनशील क्षेत्रामध्ये असल्यामुळे उक्त घटनांना आळा घालणेकरीता व वनक्षेत्राचे संरक्षण करणेकरीता नियमितपणे

सामुहिक गस्त करणे आवश्यक आहे. यामध्ये अशा वेळेस वनमजूर संवर्गातील कर्मचा-यांची भूमिका महत्वपूर्ण ठरते.

१२. महाराष्ट्रातील बहुतांश वनक्षेत्र हे एकसंध नसून विखुरलेले आहे. त्यामुळे अशा विखुरलेल्या भागातील वनक्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करणे करिता एकाच कर्मचा-यास अडचणी उद्भवतात. सबब अशा विखुरलेल्या वनक्षेत्राचे संरक्षण व संवर्धन करणेकरीता वनमजूर संवर्गातील कर्मचारी उपलब्ध असल्यास त्याबाबत सुचारु पध्दतीने नियोजन करणे व त्याची अंमलबजावणी करणे सुलभ होईल.

१३. वनविभागावर नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी आहे. अशा संपतीचे संरक्षण करण्याची जबाबदारी कंत्राटी पध्दतीने मजूर नियुक्त करुन त्याच्या देणे योग्य नाही. कारण ज्या पध्दतीने नियमित शासकीय कर्मचा-यांवर जबाबदारी असते त्याप्रमाणे कंत्राटी कर्मचा-यावर जबाबदारी नाही. वनसंपत्ती ही Open Treasure असून त्याचे संरक्षणाची जबाबदारी ही नियमित नियुक्ती कर्मचा-यावर देणे आवश्यक आहे. नियमित वनमजूर हे कंत्राटीचे तुलनेत त्यांचे वर नमुद केलेलया कामाचे प्रति जास्त जबाबदार (More Accountable) असून विश्वासाहर्य आहेत.

१४. संवेदनशील भागामध्ये गस्त करणे अथवा आपले कर्तव्य बजावणे अत्यंत जोखमीचे असल्याने त्याचप्रमाणेसंबंधित कर्मचा-याचे जिवितास सुध्दा जोखीम असण्याची शक्यता नाकारता येत नाही उलटपक्षी जर संबंधित कर्मचा-यास त्याचे रोजगाराची कायमस्वरुपी हमी असल्यास तो अधिक जोमाने व संपूर्ण समर्पण भावनेने आपले कर्तव्य बजावेल.

१५. वनक्षेत्रामध्ये अत्यंत मौल्यवान प्रजाती असून सागवन व खैर मोठ्या प्रमाणात उपलब्ध आहे. त्याचप्रमाणे वनविभागाचे मौल्यवान असे विस्तीर्ण वनक्षेत्र असून वाढती लोकसंख्या लक्षात घेता वनजमिनीवर अतिक्रमणाच्या घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे अशा मौल्यवान प्रजातींचे व वनजमिनीचे संरक्षण व संवर्धन करणेकरीता कंत्राटी कर्मचारी नेमल्यास तो आवश्यक तेवढ्या जबाबदारीने अथवा सचोटीने आपले कर्तव्य बजावेल अथवा नाही याबाबत शंका उपस्थित करण्यास वाव आहे. त्यामुळे वनमजूर संवर्गातील नियमित कर्मचारी नियुक्ती केल्यास तो जबाबदारीने व शासकीय नियमांचे यथोचित पालन करुन आपले कर्तव्य बजावू शकतो.

१६. वरील बाबी विचारात घेता वनविभागाचे विविध कामासाठी "वनसेवक" या पदाचे खुप महत्व आहे.

१७. देशामध्ये तामिळनाडू व कर्नाटक राज्यात वनरक्षक पेक्षा निम्नश्रेणीतील एक संवर्ग (Forest Watcher) याआधीच अस्तित्वात आहे. **(परिशिष्ट-१ व २)**

१८. करीता वनविभागात वनरक्षक पेक्षा निम्नश्रेणीतील एक गट-ड हा नियमित संवर्ग निर्माण करणेबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. त्या संवर्गाच्या ठळक बाबी खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(अ) सदर संवर्ग हा १००% सरळसेवेने भरण्यात येईल.

(ब) यामध्ये केवळ स्थानिक उमेदवारांना नियुक्ती देण्याची तरतूद करण्यात येईल. स्थानिक याचा अर्थ ज्या वनविभागात नियुक्ती द्यावयाची आहे त्या वनविभागातील (Division) रहिवासी असा राहील.

(क) सदर पद गट-ड मधील राहील व त्याची सातव्या वेतन आयोगात वेतनश्रेणी एस-१ (रु. १५०००-४७६००) अशी राहील.

(ड) सदर पदाचे पदनाम वनसेवक असे राहील.

(इ) सदर पदावर नियुक्तीकरीता किमान १० वी पास ही शैक्षणिक अर्हता ठेवण्यात येईल. तसेच उमेदवाराची कमाल शैक्षणिक अर्हता ही १२ वी असावी. कमाल वयोमर्यादेपेक्षा जास्त शिक्षण घेतले नसलेबाबत हमीपत्र उमेदवाराकडून लिहून घेण्यात यावे.) कमाल मर्यादा १२ वी पास न ठेवलेस उच्चशिक्षित उमेदवाराकडून जास्तीत जास्त लाभ घेतला जाऊन कमी शैक्षणिक अर्हता असणारे उमेदवारांना संधी मिळणार नाही.

(फ) वनसेवक पदावर नियुक्ती करताना वनविभागात सद्या कार्यरत रोजंदारी मजूरांना वयामध्ये (५५ वर्षापर्यंत) सुट देऊन त्यांना १०% आरक्षण देण्यात यावे. वनसेवक पदावर नियुक्तीसाठी आरक्षणाचा फायदा मिळणेकरीता रोजंदारी मजूर म्हणजे *"मजूराने प्रतिवर्ष किमान १८० दिवस तुटक-तुटकरित्या किमान कोणतेही ५ वर्ष काम केले असावे"* अशी अट राहील. परंतू रोजंदारी मजूरांनी त्यांच्या रोजंदारी कामासंबंधी न्यायालयीन प्रकरण दाखल केले असल्यास व ते प्रलंबित असल्यास वनसेवक म्हणून नियुक्तीपूर्वी असे प्रकरण परत घेतल्यानंतरच वनसेवक म्हणून नियुक्ती देण्यात यावी.

(ग) वनरक्षक (गट-क) मधील २५% पदे ही वनसेवकांमधून पदोन्नतीने भरण्यात येतील.

१९. वनविभागात सद्या असलेले वनमजूर हे खालीलप्रमाणे कामे करीतच आहेत. त्या आधारे वनसेवकांच्या प्रस्तावित कर्तव्य व जबाबदा-या खालीलप्रमाणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

(१) **नियतक्षेत्र वनसेवक (वनरक्षकाचे मदतनीस)** :- प्रत्येक नियतक्षेत्रासाठी वनरक्षकास सहाय्यक म्हणून काम करणे. यामध्ये नियतक्षेत्रात गस्त करुन वनाचे संरक्षण व संवर्धन करणे, वन्यजीवांचे संरक्षण करणे, वनगुन्हा नोंदविणेसाठी सहाय्य करणे / तपासात सहाय्य करणे, प्रलचित नियमाप्रमाणे वनक्षेत्राच्या सिमांची देखभाल करणे, वन वनव्यापासून संरक्षण करणे, वनोपजांचे संरक्षण करणे, रोपवनाचे कामे, JMFC / VEDC इत्यादीसंदर्भात कामे, कार्य आयोजनेचे अनुषंगाने कामे, मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना हाताळणेसाठी सहाय्य करणे व त्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी सहाय्य करणे, Rescue Operation ची कामात सहाय्य करणे, रोहयो अंतर्गत कामे, शासनाच्या विविध योजनेअंतर्गत येणारी कामे, या सर्व कामात वनरक्षकास सहाय्य करणे. याशिवाय वनसेवकास वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे

(२) **परिमंडळ वनसेवक (क्षेत्र सहाय्यकाचे मदतनीस)** :- प्रत्येक परिमंडळासाठी क्षेत्र सहाय्यकास सहाय्यक म्हणून काम करणे. यामध्ये परिमंडळात गस्त करुन वनाचे संरक्षण व संवर्धन करणे, वन्यजीवांचे संरक्षण करणे, वनगुन्हा नोंदविणेसाठी सहाय्य करणे / तपासात सहाय्य करणे, प्रलचित नियमाप्रमाणे वनक्षेत्राच्या सिमांची देखभाल करणे, वन वनव्यापासून संरक्षण करणे, वनोपजांचे संरक्षण करणे, रोपवनाचे कामे, JMFC / VEDC इत्यादीसंदर्भात कामे, कार्य आयोजनेचे अनुषंगाने कामे, मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना हाताळणेसाठी सहाय्य करणे व त्यामध्ये कायदा व सुव्यवस्था राखणेसाठी सहाय्य करणे, Rescue Operation ची कामात सहाय्य करणे, रोहयो अंतर्गत कामे, शासनाच्या विविध योजनेअंतर्गत येणारी कामे, या सर्व कामात वनपालास सहाय्य करणे. याशिवाय वनसेवकास वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे

(३) **वन परिक्षेत्र कार्यालयीन मदतनीस** :- वन परिक्षेत्र कार्यालयात शासनाच्या विविध योजना व संरक्षण संवर्धनाशी निगडीत विविध कार्यालयीन कामे पार पाडण्यासाठी सहाय्यक म्हणून काम करणे. याशिवाय वन परिक्षेत्र अधिका-यासोबत गस्त करणे तसेच अतिक्रमण काढण्याच्या घटना, सॉमिल तपासणी, मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना व त्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था राखणे याकामी वन परिक्षेत्र अधिका-यांना सहाय्यक म्हणून काम करणे. तसेच वनसेवकास वन परिक्षेत्र अधिका-यानी वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे

(४) **संरक्षण पथक मदतनीस** :- वनविभागातील प्रत्येक संरक्षण पथक / फिरते पथक मध्ये मदतनीस म्हणून काम करणे. याशिवाय वन परिक्षेत्र अधिका-यासोबत गस्त करणे तसेच अतिक्रमण काढण्याच्या घटना, सॉमिल तपासणी, मानव-वन्यजीव संघर्षाच्या घटना व त्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्था राखणे याकामी वन परिक्षेत्र अधिका-यांना सहाय्यक म्हणून काम करणे. वन परिक्षेत्र अधिकारी, संरक्षण पथक / फिरते पथक यांनी वनसेवकास वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे.

(५) **शासकीय कार्यालय व इतर ठिकाणी मदतनीस** :- वनविभागाचे प्रत्येक शासकीय कार्यालय / कार्यशाळा / आगार / वनविश्रामगृहे / वनोद्यान / जिल्हास्तरीय व उच्च पदस्थ अधिका-याचे निवासस्थान ही शासकीय मालमत्ता असल्याने त्याची देखरेख व इतर कामे करणे

(६) **तपासणी नाका मदतनीस** :- तपासणी नाक्यावर सहाय्यक म्हणून काम करणे

(७) **एकीकृत रोपवाटीका** (Integrated Nursery) **मजूर** :- रोपवाटीका मजूर म्हणून काम करणे. यामध्ये रोपवाटीकेची संपूर्ण देखरेख करणे, साफसफाई करणे, पाणी देणे, बियाणे गोळा करणे, रोपवाटिकेच्या कुंपणाची किरकोळ दुरुस्तीची कामे करणे इत्यादी कामांचा समावेश राहील. याशिवाय वरिष्ठांनी रोपवाटीकेसंदर्भात वेळोवेळी नेमून दिलेली कामे करणे

(८) **इतर** :- वरिष्ठांनी वेळोवेळी नेमून दिलेली इतर शासकीय कामे

२०. वनविभागात सद्या अधिसंख्य मजूर किती कार्यरत आहे व अधिकच्या किती मजूरांची आवश्यकता आहे याबाबत क्षेत्रीय स्तरावरुन माहिती मागविण्यात आली होती. त्याचा वनवृत्तनिहाय व वनविभागनिहाय तपशील यासोबत जोडला आहे. (**परिशिष्ट-३**)

२१. प्राप्त माहितीनुसार सद्यास्थितीत ४५४५ अधिसंख्य मजूर कार्यरत आहेत. तसेच वनवृत्ताकडून प्राप्त माहितीनुसार त्यांना ८४४६ अधिकच्या मजूरांची आवश्यकता आहे. परंतू ४५४५ अधिसंख्य मजूरांची पदे वेळेनुसार निरसित होणार असल्याने वनविभागास एकूण (४५४५+८४४६=) १२९९१ नियमित वनसेवक (गट-ड) पदांची आवश्यकता आहे. त्याकरीता खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

(१) एका वनसेवकाची वेतनश्रेणी :- एस-१ (रु. १५०००-४७६००)

(२) मुळ वेतन :- रु. १५०००/-

(३) महागाई भत्ता (४६%):- रु. ६९००/-

(४) घरभाडे भत्ता (१८% किंवा किमान ३६००/-):- रु. ३६००/-

(५) स्थानिक पुरक भत्ता :- रु. ९०/-

(६) वाहतूक भत्ता :- रु. १०००/-

(७) कायम प्रवास भत्ता (वनरक्षकाप्रमाणे):- रु. १५००/-

**एकूण** :- **२८०९०**

२२. अशा प्रकारे एका वनसेवकास १२ महिन्याकरीता रु. ३,३७,०८०/- इतका खर्च येणार आहे. त्यानुसार १२९९१ वनसेवकांचे पदाकरीता वर्षाचा खर्च रु. ४,३७,९०,०६,२८०/- (४३७.९० कोटी) इतका वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

२३. वनविभागावर ६१९०७ चौ.कि. वनक्षेत्राच्या संरक्षणाची व संवर्धनाची जबाबदारी आहे. या नैसर्गिक मालमत्तेचे मुल्य वेतनवार होणा-या खर्चाच्या रकमेच्या कित्येक पट जास्त आहे. वनक्षेत्र वनेत्तर कामासाठी वळती करताना नक्त वर्तमान मुल्य (NPV) वसुल करण्यात येते. NPV चे सद्याचे दर हे प्रति हेक्टर रु. १५,९५,७९०/- ते १०,६९,४७०/- असे आहेत. राज्यातील एकूण वनक्षेत्रास किमान NPV ने गुणल्यास (६१९०७०० हे. × रु. १०,६९,४७०=) रु. ६६,२०,७६,७९,२९,०००/- म्हणजेच रु. ६,६२,६७६ कोटी इतके आहे. म्हणजेच वरीलप्रमाणेवनसेवकांच्या वेतनावर होणारा खर्च हा वनक्षेत्राचे मुल्याच्या ०.०६% आहे. याचा विचार करता वेतनावर होणारा खर्च हा अत्यल्प आहे. या नैसर्गिक संपत्तीचे संरक्षण व संवर्धनाकरीता वनविभागाकडील मानव संसाधन मध्ये वाढ करणे गरजेचे आहे.

२४. वनसेवकांची वरीलप्रमाणे पदे निर्माण केल्यास खालीलप्रमाणे फायदे होणार आहेत.

(अ) मोठ्या प्रमाणात रोजगारांच्या संधी निर्माण होतील.

(ब) नियमित वनसेवक उपलब्ध झाल्याने क्षेत्रीय कर्मचा-यांचे बळकटीकरण होईल व कार्यक्षमा वाढीस येईल.

(क) वरीलप्रमाणे वनसेवकांच्या पदनिर्मितीमुळे वनसंपत्तीचे संरक्षण व संवर्धन अधिक प्रभावीपणे करता येईल.

वनसेवकांची १२९९१ पदे निर्माण करणेसंदर्भात शासन निर्णयाचा मसूदा यासोबत जोडला आहे. तरी वनसेवकांची १२९९१ पदे निर्माण करण्यात यावी, ही विनंती.

**सहपत्र** : शासन निर्णयाचा मसूदा

(एस.जी. टेंभुर्णीकर)
प्रधान मुख्य वनसंरक्षक
(वन बल प्रमुख)
महाराष्ट्र राज्य,नागपूर

**प्रतिलिपी (ई-मेलद्वारे)** :- अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना माहितीकरीता अग्रेषित.

परिशिष्ट - 3

# वनमजूरांच्या आवश्यकतेबाबत आकडेवारी

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग | दि. १/४/२०२४ रोजी कार्यरत अधिसंख्य वनमजूर | क्षेत्रीय कामाकरीता अधिकच्या मजुरांची आवश्यकता आहे किंवा कसे, असल्यास संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १ | नागपूर | नागपूर वनविभाग | ३३२ | १८९ | |
| २ | नागपूर | वर्धा वनविभाग | ७१ | १६८ | |
| ३ | नागपूर | भंडारा वनविभाग | ५७ | १७१ | |
| ४ | नागपूर | गोंदिया वनविभाग | १३८ | २०५ | |
| ५ | नागपूर | पें.व्या.प्रकल्प, नागपूर | ७० | २१४ | |
| ६ | नागपूर | नवेगाव-नागझिरा व्याघ्र राखीव, गोंदिया | १९ | ८४ | |
| ७ | नागपूर | कार्य आयोजना विभाग, नागपूर | ० | १ | |
| ८ | नागपूर | व.सं., सा.व. नागपूर (नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया | ३९ | ९४ | |
| | | **नागपूर वनवृत्त एकूण** | **७२६** | **११२६** | |
| ९ | चंद्रपूर | निर्देशन विभाग, चंद्रपूर | ० | ० | |
| १० | चंद्रपूर | ब्रम्हपूरी वनविभाग | ३३ | १०४ | |
| ११ | चंद्रपूर | मध्य चांदा वनविभाग | ९६ | १५८ | |
| १२ | चंद्रपूर | चंद्रपूर वनविभाग | २४ | १२२ | |
| १३ | चंद्रपूर | बफर, ता.अं.व्या.प्र. चंद्रपूर | ३३ | ९८ | |
| १४ | चंद्रपूर | कोअर, ता.अं.व्या.प्र. चंद्रपूर | १० | १४१ | |
| १५ | चंद्रपूर | कार्य आयोजना, चंद्रपूर | १ | १ | |
| १६ | चंद्रपूर | बांबु संशोधन केंद्र, चिचपल्ली | ० | ० | |
| १७ | चंद्रपूर | सा.व.वि. चंद्रपूर | १ | २३ | |
| | | **चंद्रपूर वनवृत्त एकूण** | **१९८** | **६४७** | |
| १८ | गडचिरोली | आलापल्ली वनविभाग | ६३ | २०२ | |
| १९ | गडचिरोली | सिरोंचा वनविभाग | ४६ | २०० | |
| २० | गडचिरोली | भामरागड वनविभाग | २३ | १८ | |
| २१ | गडचिरोली | गडचिरोली वनविभाग | ८९ | ३६३ | |
| २२ | गडचिरोली | वडसा वनविभाग | ४७ | ३३८ | |
| २३ | गडचिरोली | वनसंवर्धन तज्ञ, चंद्रपूर | ४ | १६ | |
| २४ | गडचिरोली | आलापल्ली वन्यजीव विभाग | ३ | ० | |
| २५ | गडचिरोली | सा.व.वि. गडचिरोली | २ | ९ | |
| | | **गडचिरोली वनवृत्त एकूण** | **२७७** | **११४६** | |
| २६ | अमरावती | प्रादेशिक वनविभाग (अमरावती, मेळघाट, बुलढाणा, अकोला) | २४७ | ४४३ | |
| २७ | अमरावती | वन्यजीव विभाग (सिपना, गुगामल, मेळघाट, आकोट, अकोला) | १३६ | २४१ | |
| २८ | अमरावती | व.सं., सा.व. अमरावती (अमरावती, बुलढाणा, अकोला) | २४ | ७२ | |
| २९ | अमरावती | कार्य आयोजना, अमरावती | १ | ६ | |
| ३० | अमरावती | वन प्रशिक्षण संस्था, चिखलदरा | ३ | १५ | |
| | | **अमरावती वनवृत्त एकूण** | **४११** | **७७७** | |
| ३१ | यवतमाळ | निर्देशन विभाग, यवतमाळ | ० | ० | |
| ३२ | यवतमाळ | वाशिम वनविभाग | १८ | १० | |
| ३३ | यवतमाळ | पुसद वनविभाग | २६ | ९१ | |
| ३४ | यवतमाळ | पांढरकवडा वनविभाग | ३९ | ८८ | |
| ३५ | यवतमाळ | यवतमाळ वनविभाग | १०७ | १७५ | |

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग | दि. १/४/२०२४ रोजी कार्यरत अधिसंख्य वनमजूर | क्षेत्रीय कामाकरीता अधिकच्या मजुरांची आवश्यकता आहे किंवा कसे, असल्यास संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| ३६ | यवतमाळ | कार्य आयोजना, यवतमाळ | ० | ० | |
| ३७ | यवतमाळ | मुल्यांकन, यवतमाळ | ० | ० | |
| ३८ | यवतमाळ | पांढरकवडा वन्यजीव विभाग | १३ | ६३ | |
| ३९ | यवतमाळ | सा.व.वि. वाशिम | ५ | ६ | |
| ४० | यवतमाळ | सा.व.वि. यवतमाळ | २ | २२ | |
| | | **यवतमाळ वनवृत्त एकूण** | २१० | ४५५ | |
| ४१ | छ. संभाजी नगर | छ. संभाजी नगर वनविभाग | २६४ | ० | |
| ४२ | छ. संभाजी नगर | नांदेड वनविभाग | १८१ | ४०२ | |
| ४३ | छ. संभाजी नगर | हिंगोली वनविभाग | १६ | २२ | |
| ४४ | छ. संभाजी नगर | बीड वनविभाग | ८५ | १५८ | |
| ४५ | छ. संभाजी नगर | धाराशीव वनविभाग | ६१ | ० | |
| ४६ | छ. संभाजी नगर | वन प्रशिक्षण संस्था, जालना | ८ | १० | |
| ४७ | छ. संभाजी नगर | मुल्यांकन विभाग, छ. संभाजी नगर | ० | १ | |
| ४८ | छ. संभाजी नगर | सा.व.वि. छ. संभाजी नगर | ४३ | ३३ | |
| ४९ | छ. संभाजी नगर | सा.व.वि. बीड | ३० | ३५ | |
| ५० | छ. संभाजी नगर | सा.व.वि. जालना | १६ | ४० | |
| ५१ | छ. संभाजी नगर | सा.व.वि. नांदेड | १६ | ५२ | |
| ५२ | छ. संभाजी नगर | सा.व.वि. परभणी | २१ | ० | |
| ५३ | छ. संभाजी नगर | सा.व.वि. हिंगोली | १३ | २८ | |
| | | **छत्रपती संभाजी नगर वनवृत्त एकूण** | **७५४** | **७८१** | |
| ५४ | धुळे | धुळे वनविभाग | १०७ | १५० | |
| ५५ | धुळे | नंदुरबार वनविभाग | ६८ | ६६ | |
| ५६ | धुळे | मेवासी वनविभाग | ७३ | १२ | |
| ५७ | धुळे | जळगाव वनविभाग | ५५ | १२८ | |
| ५८ | धुळे | यावल वनविभाग | ७४ | ५० | |
| ५९ | धुळे | नाशिक वन्यजीव विभाग | ३ | २० | |
| ६० | धुळे | छ. संभाजी नगर वन्यजीव विभाग | २ | २० | |
| ६१ | धुळे | संशोधन, जालना | ३ | ५ | |
| ६२ | धुळे | वन प्रशिक्षण संस्था, पाल | ० | ५ | |
| ६३ | धुळे | सा.व.वि. धुळे | ४ | २ | |
| ६४ | धुळे | सा.व.वि. नंदुरबार | १० | २० | |
| ६५ | धुळे | सा.व.वि. जळगाव | १२ | ४२ | |

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग | दि. १/४/२०२४ रोजी कार्यरत अधिसंख्य वनमजूर | क्षेत्रीय कामाकरीता अधिकच्या मजुरांची आवश्यकता आहे किंवा कसे, असल्यास संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| | | **धुळे वनवृत्त एकूण** | **४११** | **५२०** | |
| ६६ | नाशिक | पश्चिम विभाग, नाशिक | ७६ | १११ | |
| ६७ | नाशिक | पुर्व भाग, नाशिक | ८६ | २०५ | |
| ६८ | नाशिक | अहमदनगर वनविभाग | १९९ | ७२ | |
| ६९ | नाशिक | कार्य आयोजना, नाशिक | ० | ४ | |
| | नाशिक | मुल्यांकन विभाग, नाशिक | ० | १ | |
| ७० | नाशिक | पुणे वन्यजीव विभाग | ७ | ८ | |
| ७१ | नाशिक | नाशिक वन्यजीव विभाग | ४ | १२ | |
| ७२ | नाशिक | सा.व.वि. नाशिक | १६ | ४० | |
| ७३ | नाशिक | सा.व.वि. अहमदनगर | १८ | २८ | |
| | | **नाशिक वनवृत्त एकूण** | **४०६** | **४८१** | |
| ७४ | ठाणे | ठाणे वनविभाग | ३० | १५५ | |
| ७५ | ठाणे | डहाणु वनविभाग | ४७ | १६४ | |
| ७६ | ठाणे | जव्हार वनविभाग | ४१ | १३० | |
| ७७ | ठाणे | शहापुर वनविभाग | ५६ | १०१ | |
| ७८ | ठाणे | अलिबाग वनविभाग | ५१ | ८७ | |
| ७९ | ठाणे | रोहा वनविभाग | २५ | १५ | |
| ८० | ठाणे | कार्य आयोजना, डहाणू | ० | २ | |
| ८१ | ठाणे | अ.प्र.मु.व.सं.(वन्यजीव), पश्चिम मुंबई यांचे कार्यालय | ० | ० | |
| ८२ | ठाणे | सं.गां.रा.उ. | ९५ | २३४ | |
| ८३ | ठाणे | पुणे वन्यजीव विभाग | १ | २ | |
| ८४ | ठाणे | ठाणे वन्यजीव विभाग | २६ | २२० | |
| ८५ | ठाणे | सा.व.वि. ठाणे | १२ | २३ | |
| ८६ | ठाणे | सा.व.वि. अलिबाग | ३ | २९ | |
| ८७ | ठाणे | भूमी अभिलेख,पश्चिम प्रदेश पनवेल | ० | २ | |
| ८८ | ठाणे | संशोधन केंद्र वाडा | ३ | ६ | |
| ८९ | ठाणे | वनप्रशिक्षण संस्था शहापुर | ३ | ५ | |
| ९० | ठाणे | कांदळवन कक्ष | ० | ० | |
| ९१ | ठाणे | वन जमाबंदी अधिकारी, कोकण | ० | ० | |
| | | **ठाणे वनवृत्त एकूण** | **३९३** | **११७५** | |
| ९२ | पुणे | पुणे वनविभाग | १२६ | २११ | |
| ९३ | पुणे | जुन्नर वनविभाग | ६५ | १२९ | |
| ९४ | पुणे | सोलापुर वनविभाग | ६७ | ७६ | |
| ९५ | पुणे | पुणे वन्यजीव विभाग | १९ | ५२ | |
| ९६ | पुणे | संशोधन पुणे | १ | ३ | |
| ९७ | पुणे | सा.व.वि. पुणे | ११ | १० | |
| ९८ | पुणे | सा.व.वि. सोलापूर | १५ | २६ | |
| | | **पुणे वनवृत्त एकूण** | **३०४** | **५०७** | |
| ९९ | कोल्हापूर | कोल्हापूर वनविभाग | १८४ | १९० | |
| १०० | कोल्हापूर | सातारा वनविभाग | ४२ | १२९ | |
| १०१ | कोल्हापूर | सावंतवाडी वनविभाग | ५६ | ३५ | |
| १०२ | कोल्हापूर | सांगली वनविभाग | ४८ | १०५ | |
| १०३ | कोल्हापूर | चिपळुन वनविभाग | २ | २६ | |

| अ. क्र. | वनवृत्त | वनविभाग | दि. १/४/२०२४ रोजी कार्यरत अधिसंख्य वनमजूर | क्षेत्रीय कामाकरीता अधिकच्या मजुरांची आवश्यकता आहे किंवा कसे, असल्यास संख्या | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) |
| १०४ | कोल्हापूर | कोयना अभयारण्य, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापुर | ०१ | १९५ | |
| १०५ | कोल्हापूर | चांदोली राष्ट्रीय उद्यान, सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापुर | ८ | ३१ | |
| १०६ | कोल्हापूर | सह्याद्री व्याघ्र राखीव, कोल्हापुर | १७ | ३३ | |
| १०७ | कोल्हापूर | सा.व.वि. कोल्हापूर | ५२ | २९ | |
| १०८ | कोल्हापूर | सा.व.वि. सांगली | १६ | २५ | |
| १०९ | कोल्हापूर | सा.व.वि. सातारा | १४ | १२ | |
| ११० | कोल्हापूर | सा.व.वि. रत्नागिरी | ७ | ० | |
| १११ | कोल्हापूर | सा.व.वि. सिंधुदूर्ग | ४ | ४ | |
| ११२ | कोल्हापूर | संशोधन, कोयनानगर | १ | ३ | |
| ११३ | कोल्हापूर | संशोधन, दोडामार्ग | १ | ६ | |
| ११४ | कोल्हापूर | संशोधन, आजरा | ० | ६ | |
| ११५ | कोल्हापूर | संशोधन, पुणे | २ | २ | |
| | | **कोल्हापूर वनवृत्त एकूण** | **४५५** | **८३१** | |
| | | **एकूण महाराष्ट्र राज्य** | **४५४५** | **८४४६** | |